क्र.साप्रवि/रवका/न.क्र.८९५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २९० दिनांक २८ / ०४ / २०१०

विषय : कर्मचारी कल्याण निधीमध्ये वाढ करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून
दरमहा रु.१०/- (रु.दहा मात्र) कपात करण्याबाबत.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या तीन्ही कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांसाठी कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे निरनिराळया कल्याणकारी योजना राबविल्या जातात. अशा कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांसाठी कल्याणकारी योजना राबविताना कर्मचारी कल्याण निधीमध्ये असलेला निधी अपुरा पडतो असे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे सदर निधीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे असा ठराव कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ४८ व्या बैठकीमध्ये सर्वानुमते करण्यात आला.

२. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या वरील ठरावानुसार व्यवस्थापकीय संचालक यांनी प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५ नुसार त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून दरमहा रु.३/- (रु.तीन मात्र) ऐवजी रु.१०/- (रु.दहा मात्र) ची कपात माहे एप्रिल २०१० च्या पगारापासून करण्यास मंजुरी दिली आहे.

३. सदर कपात केलेली रक्कम मुख्य लेखा अधिकारी (मंडळ लेखा), मुंबई यांचे परिपत्रक क्र.२३० दि.२७.०७.२००४ मध्ये नमूद केलेल्या ४४४३३२ या लेखासंहिता (Account Code) खाली जमा करावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(सु.य.पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति,

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

D:\O&M\Adm.Cir.-F.N.895-Emp.Wel.Fund.doc
23/3/10